# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्र.पी-१/२०१४/बारा

# घोषणा

आयोगामार्फत विविध स्पर्धा परीक्षांकरिता परीक्षा योजनेसंदर्भात माहिती देताना पूर्व परीक्षेमधून मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे ८ पट उमेदवार पात्र होतील, अशा रीतीने गुणांची सीमारेषा निश्चित करण्यात येईल, असे नमूद करण्यात आले होते. त्यानंतरची एक ओळ साईटवर टाकणे राहून गेले होते. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे ८ पट उमेदवार पात्र होतील, अशा रीतीने गुणांची सीमारेषा (Cut Off Line) प्रथमत: निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, प्रत्येक प्रवर्गातील उमेदवारांसाठी साधारणपणे १० पट उमेदवार उपलब्ध होतील, अशा रीतीने सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या राखीव प्रवर्गासाठीच्या पदांवरच निवडीसाठी पात्र असतील, अशी तरतूद आयोगाच्या कार्यनियमावलीत सन २०१३ पासून आहे व त्याचप्रमाणे सर्व पूर्व परीक्षांचे निकाल जाहीर केले गेले आहेत. या पध्दतीत पदसंख्येच्या सुमारे १२ ते १४ पट उमेदवार मुख्य परीक्षेस पात्र होतात.

दिनांक : ६ मे, २०१५
ठिकाण : मुंबई

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.